ISSN 2320-4478

तत्त्वज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रकाशन

तत्त्वज्ञान

महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद,
२९ वे अधिवेशन, जळगाव

खंड ३५ अंक १-४
मे २०१३ - एप्रिल २०१४
भारतीय सौर भाद्रपद - चैत्र शके १९३५-३६
प्रकाशन - जानेवारी, २०१८

परामर्श

तत्त्वज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे त्रैमासिक प्रकाशन

संस्थापक : सुरेंद्र बारलिंगे
संपादक : सदानंद मोरे
संयुक्त संपादक : लता छत्रे
कार्यकारी संपादक : श्रीधर आकाशकर

संपादक मंडळ
डॉ. प्रदीप गोखले
डॉ. शुभदा जोशी
डॉ. दीप्ती गंगावणे
डॉ. वैजयंती बेलसरे

सल्लागार मंडळ
डॉ. नागोराव कुंभार
डॉ. अर्चना देगावकर
डॉ. सुरेंद्र गायधने
डॉ. मीनल कातरणीकर

संपादकीय सहाय्यक : सुनील राऊत

प्रसिध्दीसाठी पाठवायचे लेख व इतर सर्व व्यवहार यासाठी संपादक, परामर्श, तत्त्वज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ४११००७ यांना लिहावे.

वर्गणी रोखीने संपादक, परामर्श, तत्त्वज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पु ४११००७ या पत्यावर पाठवावी. मात्र चेकने किंवा डिमांड ड्राफ्टने वर्गणी पाठविल्यास चे किंवा ड्राफ्ट 'वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ' या नावाने काढावा तो 'संपादक, परामर्श' यांच्या पत्यावर पाठवावा. अंक न मिळाल्याची नोंद अंक प्रसिध झाल्यापासून एक महिन्याच्या आत आमच्या कार्यालयात केल्यास अंक शिल्लक असल्या पाठविला जाईल.

परामर्शचे सुधारीत वर्गणी दर

त्रैवार्षिक वर्गणी	संस्थांसाठी	रु. २०००/-
	व्यक्तींसाठी	रु. १२००/-
वार्षिक वर्गणी	संस्थांसाठी	रु. ८००/-
	व्यक्तींसाठी	रु. ५००/-
मागील खंडाची किंमत	संस्थांसाठी	रु. १०००/-
	व्यक्तींसाठी	रु. ६००/-
एक अंकाची किंमत	संस्थांसाठी	रु. २५०/-
	व्यक्तींसाठी	रु. १५०/-

जाहिरातीचे नवीन दर

अर्धपानी जाहिरात : रु. ३००/- प्रती अंक रु. ९००/- ४ अंक
पूर्ण पान जाहिरात : रु. ५००/- प्रती अंक / रु. १५००/- ४ अंक

डॉ. वेदप्रकाश डोणगावकर

अनुक्रमणिका

अ. क्र.	लेखक	लेख	पृ. संख्या
१.	शंकर रामचंद्र तळघट्टी	तत्त्वज्ञान आणि जीवन : अध्यक्षीय भाषण	१
२.	देवानंद सोनार	श्रीमद्भगवद्गीतेतील विश्वरूपदर्शनयोग आणि ग्रामगीतेतील आत्मानुभव : एक तुलनात्मक अध्ययन	१७
३.	संगीता पांडे	उपनिषदातील धर्म संकल्पनेचा अन्वयार्थ	२५
४.	स्वीटी प्रकाश खांडरे	ईशावास्योपनिषदातील जीवनदृष्टी	३१
५.	द्वारकाधीश दिगंबर जोशी	भगवान आद्य शंकराचार्यांचे अद्वैत वेदान्त दर्शन : एक दृष्टिक्षेप	३५
६.	वेदप्रकाश डोणगावकर	अद्वैत आणि माध्यमिक - साम्य आणि भेद	४३
७.	द. धों. बंदिष्टे	आद्य शंकराचार्यांच्या अद्वैत वेदान्ताच्या विरुद्ध काही तर्क	४७
८.	भावना चौधरी	चित्तवृत्तीचा निरोध	५१
९.	अनीता सुधीर बोथरा	सोमदेवकृत लौकिक आणि पारलौकिक गृहस्थधर्म	५७
१०.	कौमुदी बलदोटा	लोकायत - मत व्यक्त करण्याच्या शैलीतील विभिन्नता	७५
११.	दीपक शिरूडे	चरकसंहितेतील आचार-रसायन : एक चिंतन	९५
१२.	सचिन राजपूत	नाथ संप्रदायाचे सामाजिक योगदान	१०१
१३.	प्रभाकर कीर्तनकार	संत तुकाराम महाराजांच्या तत्त्वज्ञानातील स्त्री-दर्शन	१११
१४.	धनराज धनगर	वारकरी संप्रदायाचा मानवतावादी दृष्टिकोनातून अन्वयार्थ	११७

अ.क्र.	लेखक	लेख	पृ. संख्या
१५.	विद्या मिलिंद गारखेडकर	सद्‌गुण नीतिमीमांसेच्या अनुषंगाने श्री. शं.बा. दांडेकर यांचे नीतिशास्त्र-विषयक विचार : एक तात्त्विक अभ्यास	१२९
१६.	योगिता श्रीधर काळे	भर्तृहरी यांच्या नीतिशतकाचे तात्त्विक विवेचन	१३५
१७.	एन. एच. फाफाळे	स्त्रीवादी नीतिशास्त्र : कॅरोल गिलिगन यांचे नैतिक चिंतन	१४१
१८.	तनुजा येलाले	काशीबाई कानिटकरांची 'स्त्री-राज्या'ची संकल्पना : एक अभ्यास	१४९
१९.	धनराज सुभाष हाडुळे	सम्राट अशोकाच्या धर्माचे स्वरूप	१५५
२०.	मिलिंद केशव नरवाडे	जैन धर्मातील अहिंसा	१५९
२१.	दीप्ती गंगावणे	आधुनिकोत्तर विचारसरणी आणि ज्ञानशास्त्र	१६९
२२.	किसन पाटील	आधुनिकतेवरील प्रतिक्रिया : उत्तर आधुनिकतावाद	१७७
२३.	हेमलता मोरे	नैगमानिक युक्तिवादाचे समर्थन करणे योग्य आहे का?	१८५
२४.	लता छत्रे	गौतम बुद्धाच्या राजकीय तत्त्वज्ञानाच्या संदर्भात अहिंसा	१८९

अद्वैत आणि माध्यमिक – साम्य व भेद

नास्तिक परंपरेतील माध्यमिक संप्रदाय आणि आस्तिक परंपरेतील अद्वैत सिद्धान्त हे भारतीय तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. जेथे माध्यमिक संप्रदाय निर्वाणाचे ध्येय समोर ठेवून सामान्य स्वरूपाच्या ज्ञानाची आवश्यकता प्रतिपादित करतात (उदा. हे शून्य आहे.), तेथे अद्वैतवादी मोक्षाचे ध्येय समोर ठेवून वैयक्तिक पातळीवर आत्मज्ञानाची अपेक्षा व्यक्त करतात (उदा. मी ब्रह्म आहे). एकंदर या दोन्ही संप्रदायांत ध्येयासंबंधी साम्य असले तरीही ते प्राप्त करण्याच्या पद्धतीमध्ये काहीसा भेद आहे.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये 'नयवादी' दृष्टिकोणाच्या आधारे अद्वैत आणि माध्यमिक संप्रदायातील फक्त साम्य आणि भेदांवर प्रकाश टाकण्यात येत आहे म्हणून ही या दोन संप्रदायांतील संकल्पनांची तुलना असल्याचे मी स्वतः स्पष्ट करीत आहे.

'सर्व शुन्यत्' हे माध्यमिक संप्रदायाचे प्रमुख वाक्य आहे. या संप्रदायाचे प्रमुख नागार्जुन म्हणतात त्याप्रमाणे, 'जो शून्याला समजतो तो सर्व अर्थ समजू शकतो आणि जो शून्यतेला समजू शकत नाही तो काहीही समजू शकत नाही.'[१] अर्थात निर्वाणासाठी शून्यतेचे ज्ञान असणे आवश्यक आहेच असे ते मानतात. याशिवाय दुसरी बाब अशी की, शून्याला समजता येत असल्यामुळे त्याचे स्वरूप भावात्मक आहे, अभावात्मक नाही. म्हणजेच शून्यता सत्, असत्, सत्-असत् यांपैकी काहीतरी एक असले पाहिजे, परंतु नागार्जुन या सबंधी सहमती दर्शवित नाहीत. अर्थात ते शून्यता अवर्णनीय असल्याचे सांगतात.[२] त्यांची ही शून्यताच त्यांच्यासाठी परमतत्त्व आहे. म्हणजेच हे परमतत्त्व अर्थात शून्यता सत्, असत्, सत्-असत् अस्ती, सत्-असत् नास्ती यांपैकी काहीतरी आहे हे सांगता येत नाही. नागार्जुनांची ही भूमिका 'शून्यवाद' म्हणून ओळखली जाते.

नागार्जुनांनी वापरलेला 'अवर्णनीय' हा शब्द शंकराचार्यांच्या अद्वैत सिद्धान्तामध्ये 'अनिर्वचनीय' नावाने पाहावयास मिळतो. हे या दोन्ही संप्रदायांतील साम्य आहे. मात्र या दोन्ही संप्रदायांनी ज्या 'अवर्णनीय' किंवा 'अनिर्वचनीय' शब्दाचा उल्लेख केला आहे त्याचा विषय स्वतंत्र आहे. जेथे माध्यमिक 'परमतत्त्व' अवर्णनीय आहे

असे मानतात तेथे अद्वैतवादी 'भ्रमाच्या ज्ञानाच्या स्वरूपाला' अनिर्वचनीय मानतात. असे असले तरीही माध्यमिकांचे 'परमतत्त्व' आणि अद्वैत्यांचे 'भ्रमयुक्त ज्ञान' यांचे अस्तित्व नकारात्मक नाही. हे या दोन्ही संप्रदायांतील साम्य आहे.

याशिवाय येथे एक बाब लक्षात घेण्यासारखी आहे ती म्हणजे, माध्यमिकांचे 'परमतत्त्व' अद्वैत सिद्धान्तातील 'ब्रह्म' या शब्दाशी साम्य ठेवित नाही. यासंदर्भात प्रो. गौरांग चरण नायक म्हणतात, 'निःस्वभावते शिवाय दुसरे परमात्मतत्त्व नाही.'[३] अर्थात ज्याचा काही स्वभाव नाही ते परमतत्त्व होय, तेच शून्य होय आणि या शून्यतेचे स्वरूप अवर्णनीय आहे. याउलट अद्वैतवादी शंकराचार्य ब्रह्माला उपादान व निमित्तकारण, कर्ता मानतात. अर्थात ते स्वभाववादाला येथे स्वीकारतात. यावरून या दोन संप्रदायांत भेद आहे. मात्र प्रश्न पडतो की, शंकराचार्य कोणत्या ब्रह्माविषयी येथे चर्चा करीत आहेत? तेव्हा लक्षात घेतले पाहिजे की निमित्तोपादान व कर्ता असलेला ब्रह्म सगुण असल्यामुळे त्याची तुलना निःस्वभावतेशी अर्थात शून्यतेशी करता येणार नाही. म्हणून जर आपण शून्यतेची तुलना निर्गुण ब्रह्माशी केली तर 'नेति नेति' या उपनिषदातील शब्दाचे विश्लेषण शंकराचार्यांनी नकारात्मक केले असल्यामुळे ते शून्यतेशी साम्य पावणारे आहे असे आपल्याला म्हणता येईल. कारण निगुर्ण ब्रह्म शून्यतेप्रमाणे अवर्णनीय आहे.

माध्यमिकांच्या दृष्टीने ज्याला आपण पाहू शकतो असे ते जगतदेखील अवर्णनीय आहे. निश्चितच माध्यमिकांची भूमिका बुद्धांच्या अनित्यवादावर अवलंबून आहे, ज्याला क्षणिकवाद म्हटले जाते. क्षणिकवादानुसार सृष्टीमध्ये प्रत्येक वस्तू क्षणिक आहे, परिवर्तनीय आहे. मात्र या परिवर्तनाचे ज्ञान होते का? असा प्रश्न चिकित्सक उपस्थित करतात. तेव्हा बौद्धदर्शनकार नदीच्या प्रवाहाचे उदाहरण देऊन क्षणिकवादाचे महत्त्व पटवून देतात. कदाचित याच बाबीकडे लक्ष पुरवित माध्यमिक प्रमुख नागार्जुनांनी परिवर्तन अवर्णनीय असल्याचे हेरले आणि शून्यवादाची स्थापना केली. निश्चितच नागार्जुनांनी सांगण्याचा प्रयत्न केला असावा की, 'हे जगत आहे (सत्), त्याचे परिवर्तन होते (असत्), परत ते नव्याने उदयास येते (सत्-असत्), पुन्हा तेही परिवर्तन पावते (सत्-असत् नाही)'. अर्थात हा सर्व प्रकार अवर्णनीय आहे. निश्चितच माध्यमिकांची ही भूमिका सापेक्षवादी आहे.[४] यावरून प्रश्न पडतो की जगताचे अस्तित्वही सापेक्ष आहे की काय? नाही, जगताचे अस्तित्व सापेक्ष नाही कारण माध्यमिक जगताच्या अस्तित्वाविषयी कोठेही नकारात्मक भूमिका घेत नाहीत,[५] तर जगताच्या स्वरूपाविषयी किंवा स्वभावाविषयी अनिश्चितता दर्शवितात.

अद्वैत वेदान्तामध्ये जगताला व्यावहारिकदृष्ट्या सत् मानले गेले आहे आणि पारमार्थिकदृष्ट्या मिथ्या, कारण पारमार्थिक दृष्टीने जे नित्यत्व म्हणून स्वीकारले जाते ते अबाधित राहते आणि जगताच्या संदर्भात अबाधित्वाची संकल्पना शक्य नसल्याने जगत् मिथ्या ठरते. अर्थात जगत परिवर्तनीय असल्याचे अद्वैतवादीही मान्य करीत असावेत.

एकंदर माध्यमिक आणि अद्वैतांच्या मते जगताचे स्वरूप सापेक्ष आहे. परंतु या दोन्हींतील एक फरक असा आहे की, माध्यमिक जेथे सत्ताशास्त्रीय दृष्टिकोनातून जगताची सापेक्षता ठरवितात, तेथे अद्वैत सिद्धान्त ज्ञानमीमांसीय दृष्टिकोनाचा आधार घेतात. याशिवाय माध्यमिक जेथे जगताचे अस्तित्व निरपेक्ष असल्याचे सांगत जगताला व्यावहारिक (संवृत्ती सत्य) पातळीवर आणि पारमार्थिक पातळीवर विभाजीत करतात त्याचप्रमाणे अद्वैतवादीदेखील जगताची, व्यावहारिक आणि पारमार्थिक स्तरावर तुलना करतात. मात्र जेथे माध्यमिक पारमार्थिक सत्याच्या प्राप्तीकरता व्यावहारिक सत्याला साधन मानतात तेथे अद्वैतवादी पारमार्थिक सत्याच्या प्राप्तीसाठी जगत् गौण मानतात.

माध्यमिक जगताच्या अस्तित्वाशिवाय पारमार्थिक सत्यालाही निरपेक्ष मानतात. त्यांच्या मते जगताचे सर्व अनुभव सापेक्ष आहेत, परंतु ज्या ठिकाणी निर्वाणाची अनुभूती प्राप्त होते ते 'पारमार्थिक सत्य' नित्य आणि निरपेक्ष आहे.[६] मात्र ही अनुभूती दृश्य जगताच्या पलीकडची आहे. निश्चितच माध्यमिकांची ही भूमिका अद्वैत सिद्धान्ताशी अधिक साम्य ठेवणारी आहे. अद्वैतवादी शंकराचार्यदेखील जगताच्या अनुभवाला सापेक्ष मानतात कारण जगत व्यावहारिकदृष्ट्या सत् आहे मात्र पारमार्थिकदृष्ट्या 'ब्रह्म' हे एकमेव सत्य असल्यामुळे तेथे जगत असत् आहे. एकंदर माध्यमिक आणि अद्वैतवादी पारमार्थिक सत्ता, दृष्टिकोन यांनाच सत् मानतात. हे या दोघांतील साम्य आहे.

याशिवाय हे दोन्ही संप्रदाय पारमार्थिकदृष्ट्या जे सत् आहे तेच परमतत्त्व आहे असे मानतात हे यांच्यातील साम्य आहे. मात्र माध्यमिकांच्या मते 'शून्यता' आणि अद्वैतवाद्यांच्या मते 'निर्गुण ब्रह्म' हे परम प्राप्तव्य असल्यामुळे यांच्यात भेद वाटतो. मात्र या दोघांच्या परमप्राप्तव्याच्या मागचे ध्येय समान असल्यामुळे यांच्यात साम्य वाटते परंतु माध्यमिक पारमार्थिक सत्याच्या आधारे निर्वाण हे ध्येय समोर ठेवतात तर अद्वैतवादी मोक्ष हे ध्येय समोर ठेवतात म्हणून यांच्यात भेद वाटतो. असे असले तरीही शेवटी निर्वाणातून किंवा मोक्षातून जे प्राप्त केले जाते ते काहीही असो त्यातून समोर येणारे सामान्यत्व, आत्मज्ञान, आत्मकल्याण

किंवा समाधान असते हे गृहीत धरून या दोन्ही सिद्धांन्ताच्या ध्येयामध्ये साम्यता आहे असे म्हणता येईल.

तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, **वेदप्रकाश डोणगावकर**
मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय,
वाशिम

संदर्भसूची

१ निगम, शोभा, 'भारतीय दर्शन', २००८, पृ. १२०
२ तत्रैव, पृ. १२०
३ 'दार्शनिक' त्रैमासिक (मार्च २००१), पृ. ८२
४ चौधरी, पी. डी., 'भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास', २००२, पृ. ९१
५ तत्रैव, पृ. ९१
६ सिन्हा, हरेंद्रप्रसाद, 'भारतीय दर्शन की रूपरेखा', २००७, पृ. १२८

परामर्श

रजि. नं. ३५६५३/७९

तत्त्वज्ञान विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे-४११ ००७
महाराष्ट्र (भारत)